# मुस्लिम कोणास म्हणतात?

लेखक
**सय्यद अबुल आला मौदूदी**

अनुवाद
**शफी मुल्ला**

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे."

मुस्लिम बांधवांनो! आज मी आपणाला मुस्लिमांची गुणवैशिष्ट्ये काय आहेत ते सांगणार आहे. म्हणजेच मुस्लिम होण्याकरिता कमीतकमी कोणत्या शर्थी वा अटी असल्या पाहिजेत की ज्याच्यामुळे तो खरा व योग्य मुस्लिम म्हणण्यास पात्र ठरेल.

या गोष्टीला समजण्या व जाणण्याकरिता आपण सर्वप्रथम हे जाणले पाहिजे की, कुफ्रचा अर्थ काय आहे आणि इस्लामचा अर्थ काय आहे. कुफ्र म्हणजेच अल्लाहच्या आज्ञांना व आदेशांना नकार देणारा, नाकारणारा आणि इस्लाम म्हणजे अल्लाहचा आज्ञाधारक सेवक, गुलाम व भक्त बनणारा. म्हणजेच कुफ्रचा अर्थ अल्लाहची अवज्ञा करणे होय आणि इस्लामचा अर्थ अल्लाहची आज्ञा पाळणे होय. अशा पद्धती, नीतीनियम, कायदेकानू किंवा ईशआदेश व आज्ञा नाकारणे की ज्या आज्ञा, कायदेकानू अल्लाहने मानवाच्या मार्गदर्शनासाठी पाठविले आहेत म्हणजे कुफ्र होय. इस्लाम व कुफ्रचा हा फरक पवित्र ग्रंथ कुरआनमध्ये अगदी स्पष्टपणे दर्शविला आहे.

"आणि जे अल्लाहच्या अवतरित कायद्याप्रमाणे आपले निर्णय घेत नाहीत असेच लोक वस्तुतः काफिर आहेत." *(दिव्य कुरआन, ५:४४)*

निर्णय घेणे यांचा अर्थ असा नाही की जगातल्या न्यायालयामध्ये जो खटला जाईल फक्त त्याचाच निर्णय ईशग्रंथामध्ये दिलेल्या निर्णयाप्रमाणे घ्यावा. उलटपक्षी निर्णयाचा खरा अर्थ असा आहे की, प्रत्येक व्यक्ती आपल्या जीवनामध्ये प्रत्येक वेळी कितीतरी निर्णय घेत असतो. प्रत्येक वेळी तुमच्यासमोर हा प्रश्न उभा राहतो की, आता हे काम करावे की न करावे? एखादी गोष्ट याप्रमाणे करावी की दुसऱ्या पद्धतीने करावी? एखाद्या मामल्यामध्ये ही पद्धत वापरावी की दुसरी पद्धत वापरावी? अशा पुष्कळ (सर्व) प्रसंगी एक ईशग्रंथ कुरआन आणि पैगंबरांची सुन्नत (कथनी व करणी) मार्गदर्शन करते. आणि दुसरी पद्धत म्हणजे मानवाचे मन, आपल्या स्वेच्छा किंवा आपल्या वाडवडिलांचे रीती-रिवाज, रूढी-परंपरा किंवा मानवनिर्मित कायदेकानून होय. आता जी व्यक्ती अल्लाहने बनविलेल्या कायद्यांचा, पद्धतींचा निर्णय मानण्याऐवजी दुसऱ्या पद्धतीप्रमाणे काम करण्याचा निर्णय घेते तीच व्यक्ती वस्तुतः कुफ्रचा मार्ग अवलंबविते. त्या व्यक्तीने संपूर्ण जीवनभर ही पद्धतच अवलंबिली तर तो पूर्ण काफिर आहे. जर

तो काही बाबतीत तर ईशमार्गदर्शन व कायद्याचा अवलंब करतो आणि काही बाबतीत आपल्या मनाप्रमाणे, इच्छेप्रमाणे किंवा रूढीपरंपरा, रितीरिवाज किंवा मानवी कायद्यांना ईशकायद्यापेक्षा श्रेष्ठ मानत असेल तर तो जेवढ्या प्रमाणात म्हणून अल्लाहशी द्रोह, बंड करतो व अल्लाचा कायदा मानत नाही; तेवढा तो कुफ्रमध्ये ओढला जातो. म्हणून कोण अर्धा काफिर आहे, कोण एक चतुर्थांश काफिर आहे, कुणामध्ये एक दशांश कुफ्रचा हिस्सा आहे, कुणामध्ये एक विसांश हिस्सा आहे. म्हणजेच जेवढी ईशकायद्याची अवज्ञा, विद्रोह व बंड तेवढ्या प्रमाणात क्रुफ त्याच्यामध्ये आहे.

इस्लाम याच्याशिवाय काही नाही की मानव फक्त अल्लाहचाच गुलाम आणि दास आहे. तो आपल्या स्वेच्छेचा, मनाचा, वाडवडिलांचा, आपल्या खानदान व वंश आणि गटाचा दास, गुलाम असू नये किंवा कुणा मौलवी, संत, पीर, जमीनदार, तहसीलदार किंवा मॅजिस्ट्रेट साहेबांचा दास, भक्त किंवा गुलाम असू नये. मानव अल्लाहला सोडून कोणाचाही गुलाम, दास व भक्त असू नये. पवित्र धर्मग्रंथ कुरआनमध्ये याविषयी आदेश खालीलप्रमाणे आहेत,

''(हे पैगंबर (स.)!) सांगा, ''हे ग्रंथधारकानो या, एका अशा बाबीकडे जी आमच्या आणि तुमच्या दरम्यान समान आहे, हे की आपण अल्लाहशिवाय कोणाचीही भक्ती करू नये, त्याच्याबरोबर कोणासही भागीदार ठरवू नये, आणि आपल्यापैकी कोणीही अल्लाहशिवाय इतर कोणास आपला पालनकर्ता बनवू नये.'' या आवाहनाला स्वीकारण्यापासून ते जर पराङ्मुख झाले तर स्पष्ट सांगून टाका की साक्षी राहा आम्ही तर मुस्लिम (केवळ अल्लाहची भक्ती करणारे व त्याचे आज्ञापालन करणारे) आहोत.'' *(दिव्य कुरआन, ३ : ६४)*

'' हे लोक अल्लाहच्या आज्ञापालनाची पद्धत (अल्लाहचा दीन) सोडून इतर एखादी पद्धत इच्छितात? वास्तविक पाहता आकाश व पृथ्वीमध्ये जे जे काही आहे ते आपणहून किंवा अपरिहार्यपणे अल्लाहला समर्पित झाले आहेत. आणि त्याच्याकडे सर्वांना रुजू व्हायचे आहे? '' *(दिव्य कुरआन, ३ : ८३)*

वरील दोन्ही वचनांमध्ये (आयतीमध्ये) एकच गोष्ट सांगितली गेली आहे. ती म्हणजे, खरा ईशधर्म अल्लाहची गुलामी व आज्ञापालन करणे होय. अल्लाहच्या (गुलामीचा) उपासनेचा, प्रार्थनेचा अर्थ असा आहे की, रात्रंदिवस सदैव त्याच्या आदेशाचे, आज्ञेचे पालन करावे आणि ज्या गोष्टींची त्याने मनाई केली आहे

ती न करणे आणि ज्या गोष्टी करण्याचा त्याने हुकूम, आदेश दिला आहे त्याची काटेकोर अंमलबजावणी करणे होय. प्रत्येक बाबतीत हे पाहाणे की अल्लाहचा आदेश, हुकूम त्या बाबतीत काय आहे. हे पाहू नये की, आपले स्वत:चे मन, इच्छा काय सांगत आहे, आपली बुद्धी काय म्हणते. वाडवडिलांनी, पूर्वजांनी काय केले होते. खानदान, कूळ आणि भावकीची काय इच्छा आहे, मौलवी साहेब, पीर व साधुसंत साहेब काय म्हणताहेत आणि अमुक साहेबांची काय आज्ञा आहे किंवा तमुक साहेबांची काय मर्जी आहे. जर तुम्ही अल्लाहच्या, आदेशाला व हुकुमाला सोडून कोणत्याही साहेबांचे ऐकले व मानले तर तुम्ही त्याला ईशत्वात भागीदार ठरविले व त्याला तो दर्जा व महत्त्व दिले जो केवळ अल्लाहचाच दर्जा आहे. आदेश, हुकूम व आज्ञा देणारा तर फक्त अल्लाहच आहे. पवित्र धर्मग्रंथ कुरआनमध्ये आदेश दिला गेला आहे,

"आज्ञा, आदेश फक्त अल्लाहचेच."

"उपासनेच्या लायक तर केवळ तोच आहे ज्याने तुम्हाला निर्माण केले आणि ज्याच्यामुळे तुम्ही जिवंत आहात. पृथ्वी व आकाशातील प्रत्येक वस्तु त्याच्याच आज्ञेचे पालन करत आहे."

कोणताही दगड, एखाद्या दगडाची आज्ञा पाळत नाही, कोणतेही झाड एखाद्या झाडाच्या आज्ञेचे पालन करीत नाही. कोणताही पशू एखाद्या पशूच्या आज्ञेचे पालन करीत नाही. मग काय तुम्ही जनावरे, झाडे आणि दगडांपेक्षाही नीच, हीन दर्जाचे आहात की त्यांनी तर केवळ अल्लाहच्या आज्ञेचे पालन करावे आणि तुम्ही अल्लाहला सोडून मानवाच्या आज्ञेचे पालन करावे? ही आहे ती गोष्ट जी पवित्र, दिव्य कुरआनच्या या दोन आयतींमध्ये वर्तविली गेली आहे.

आता मी आपणाला सांगू इच्छितो की कुफ्र (नाकारणारे) पथभ्रष्टता, मार्गभ्रष्टता (गुमराही) वस्तुत: कुठे जन्म घेते, कोठून येते. पवित्र कुरआन आम्हाला मार्गदर्शन करतो की हे दुर्दैवी संकट येण्याचे तीन मार्ग आहेत.

### मार्गभ्रष्टतेचे तीन मार्ग

**पहिला मार्ग-** हा मार्ग मानवाच्या स्वत:च्या इच्छा (स्वेच्छा), मनातील विचार आहेत. पवित्र ग्रंथ कुरआनमध्ये सांगितले आहे,

"त्याच्यापेक्षा मोठा मार्गभ्रष्ट कोण असू शकेल ज्याने अल्लाहच्या आदेशाऐवजी आपल्या मनाच्या इच्छांचे अनुसरण केले? अशा अत्याचारी लोकांना अल्लाह सन्मार्ग दाखवित नाही." *(दिव्य कुरआन, २८:५०)*

याचा अर्थ असा की सर्वांत अधिक मानवाला मार्गभ्रष्ट करणारी गोष्ट माणसाच्या स्वत:च्या मनातील इच्छा आहे. जो मनुष्य स्वत:च्या इच्छेचा, मनाचा गुलाम झाला तो अल्लाहचा दास, भक्त बनणे कदापि शक्य नाही. जरी अल्लाहने त्याला मनाई केली तरी तो सदैव असेच पाहील की मला कोणत्या कामात धनप्राप्ती होईल, मला सन्मान व प्रसिद्धी कोणत्या कामात मिळेल, मला आमोद-प्रमोद व आनंद कोणत्या कामात मिळेल, मला आराम व ऐश्वर्य कोणत्या कामात प्राप्त होईल. बस्स, या गोष्टी ज्या कामात असतील त्यांचाच तो अवलंब करील. या गोष्टी ज्या कामात नसतील त्या तो कदापि करणार नाही; मग त्याची आज्ञा अल्लाहने का दिलेली असेना. तर मग याचा अर्थ असा की, अशा माणसाचा ईश्वर, महान अल्लाह नसून त्याचा ईश्वर त्याचे स्वत:चे मन आहे. त्याला सद्बुद्धी कशी मिळू शकेल? हीच गोष्ट दिव्य कुरआनमध्ये अशा प्रकारे सांगितली आहे,

"हे पैगंबर! कधी तुम्ही त्या माणसाच्या स्थितीचा विचार केला आहे काय ज्याने आपल्या मनोवासनेला आपला देव बनविला आहे? तुम्ही अशा माणसाला सरळ मार्गावर आणण्याची जबाबदारी घेऊ शकता काय? काय तुम्हाला असे वाटते की यापैकी बहुतेक लोक ऐकतात व समजतात? हे तर पशुप्रमाणे आहेत किंबहुना त्यांच्याहूनही पुढे निघालेले." *(दिव्य कुरआन, २५: ४३-४४)*

स्वेच्छेचे, मनाचे गुलाम, दास (असणे) बनणे ही जनावरांपेक्षासुद्धा घृणास्पद व अत्यंत वाईट बाब आहे की ज्याबाबत काहीच शंका नाही. कोणी जनावर आपल्याला असा आढळणार नाही की जे अल्लाहने ठरवून दिलेल्या मर्यादा, सीमा, ओलांडून पुढे जात असेल. प्रत्येक जानवर वा प्राणी तीच वस्तू खातो जी अल्लाहने त्याच्यासाठी ठरवून दिलेली आहे. आणि जितके काम ज्या जनावरांकरिता वा प्राण्याकरिता ठरवून दिले आहे तितकेच काम तो करतो, पण हा मानव एक असा प्राणी आहे की जेव्हा तो आपल्या स्वेच्छेचा, मनाचा

गुलाम व दास बनतो तेव्हा तो अशी कृत्ये करत जातो ज्यांची शैतानालासुद्धा लाज वाटावी.

**दुसरा मार्ग-** दुसरा मार्ग असा आहे की वडिलोपार्जित ज्या चाली-रीती, रुढी-परंपरा, ज्या श्रद्धा (अंधश्रद्धा) आणि जी विचारसरणी व रंग-ढंग, व्यवहार पूर्वीपासून चालत आलेले आहेत त्याचा मनुष्य गुलाम व दास बनतो आणि अल्लाहच्या आज्ञेपेक्षासुद्धा वाडवडिलांच्या आज्ञा श्रेष्ठ मानू लागतो. वडिलोपार्जित आज्ञेविरुद्ध अल्लाहची आज्ञा वा हुकूम त्याच्यासमोर प्रस्तुत केली गेली तर तो सांगतो की मी तेच करीन जे माझे वाडवडील व पूर्वज करत असत आणि जी माझ्या घराण्याची व समाजाची परंपरा आहे. जो मनुष्य या परंपरेच्या आज्ञा पाळण्याच्या रोगाने, आजाराने पछाडलेला आहे; तो कसा काय अल्लाहचा, दास व गुलाम बनू शकेल? त्याचे ईश्वर तर त्याचे वाडवडील, त्याचे घराणे व त्याच्या समाजाचे लोक आहेत. मग त्याला हा खोटा दावा करण्याचा काय अधिकार की मी मुस्लिम आहे? पवित्र कुरआनमध्येसुद्धा याबाबत कठोरपणे ताकीद देऊन खबरदार केले आहे,

"आणि जेव्हा त्यांना सांगितले जाते कि तुम्ही त्या आज्ञांचे अनुसरण करा जे अल्लाहने अवतरले आहेत तेव्हा ते म्हणतात कि "आम्ही त्याच गोष्टींचे अनुसरण करू ज्याचे अनुसरण आमचे वाडवडील करीत होते." त्यांना काहीही कळत नसताना व ते सन्मार्गावर नसतानादेखील त्यांचेच अनुसरण करणार का?"

*(दिव्य कुरआन, २:१७०)*

पवित्र कुरआनमध्ये दुसऱ्या ठिकाणी पण खालीलप्रमाणे उल्लेख आहे,

"आणि जेव्हा त्यांना सांगण्यात येते की या, त्या कायद्याकडे जो अल्लाहने अवतरला आहे आणि या, पैगंबराकडे, तर ते उत्तर देतात की आमच्यासाठी तर तीच पद्धत पुरेशी आहे ज्यावर आमचे पूर्वज आम्हाला आढळले आहेत. मग काय हे पूर्वजांचेच अनुकरण करीत राहातील जरी त्यांना काहीही माहीत नसेल व योग्य मार्गाची त्यांना जाणीवच नाही? हे श्रद्धावंतांनो, स्वत:ची काळजी घ्या, एखाददुसऱ्याच्या पथभ्रष्ट होण्याने तुमचे काहीही बिघडत नाही जर तुम्ही स्वत: सरळमार्गावर असाल, अल्लाहकडे तुम्हां सर्वांना परत जायचे आहे मग तो तुम्हाला दाखवेल की तुम्ही काय करीत राहिला आहात."

*(दिव्य कुरआन, ५:१०४-१०५)*

ही अशी मार्गभ्रष्टता आहे ज्यात जवळजवळ प्रत्येक काळातील अज्ञानी लोक गुरफटलेले आहेत आणि सतत अल्लाहच्या पैगंबराचे मार्गदर्शन स्वीकारण्यापासून माणसाला विरोध करत राहीले आहे. पैगंबर मूसा (अ.) यांनी जेव्हा लोकांना अल्लाहच्या शरियतकडे (कायदेकानूकडे) बोलाविले होते तेव्हादेखील लोकांनी असेच म्हटले होते,

''त्यांनी उत्तरात सांगितले, ''तू याकरिता आला आहेस काय की आम्हाला त्या पद्धतीपासून परावृत्त करावेस ज्यावर आमचे पूर्वज आम्हाला आढळले आणि पृथ्वीवर मोठेपणा तुम्हा दोघांचा चालावा? तुमचे म्हणणे तर आम्ही ऐकणारे नाहीच.'' *(दिव्य कुरआन, १०:७८)*

इब्राहीम (अ.) यांनी जेव्हा आपल्या समूहाला, समाजाला अनेकेश्वरत्वापासून रोखले तेव्हासुद्धा असेच सांगितले होते,

'त्यांनी उत्तर दिले, ''आम्हाला आमचे वाडवडील त्यांची उपासना करताना आढळले आहेत.'' *(दिव्य कुरआन, २१:५३)*

थोडक्यात असे की, अशाच प्रकारे प्रत्येक प्रेषितांसमोर लोकांनी हाच पुरावा दिला की तुम्ही जे काही सांगता ते आमच्या वाडवडिलांच्या परंपरेविरुद्ध आहे. म्हणून ते आम्ही मान्य करीत नाही. पवित्र कुरआनमध्येसुद्धा म्हटले आहे,

''अशा प्रकारे तुमच्या अगोदर ज्या ज्या कुणा वस्तीत आम्ही एखादा भय दाखविणारा पाठविला, त्यातील सुखवस्तू लोकांनी हेच सांगितले की आम्हाला आमचे वाडवडील एका पद्धतीवर आढळले आहेत आणि आम्ही त्यांच्याच पाऊलखुणांचे अनुसरण करीत आहोत. प्रत्येक नबीने त्यांना विचारले, काय तुम्ही त्याच वहिवाटीवर चालत राहाणार, मी जरी तुम्हाला त्या मार्गापेक्षा योग्यतम मार्ग दाखवावा, ज्यावर तुम्हाला आपले वाडवडील आढळले आहेत? त्यांनी सर्व प्रेषितांना हेच उत्तर दिले की ज्या धर्माकडे बोलविण्यासाठी तुम्ही पाठविला गेला आहात आम्ही त्याचे नाकारणारे आहोत. सरतेशेवटी आम्ही त्यांचा समाचार घेतला आणि पहा की खोटे ठरविणाऱ्यांचा शेवट कसा झाला.''

*(दिव्य कुरआन, ४३:२३-२५)*

हे सर्व काही सांगितल्यावर महान अल्लाह फर्मावितो की, एक तर वाडवडिलांचेच अनुकरण करा अथवा आमच्या आदेशांचे पालन करा. या दोन्ही गोष्टी एकाच वेळी होऊ शकत नाहीत. मुस्लिम बनू इच्छिता तर सर्व काही

सोडून केवळ तीच गोष्ट मान्य करा जी आम्ही सांगितली आहे,

"आणि जेव्हा त्यांना सांगण्यात येते की अनुकरण करा त्या गोष्टीचे, जी अल्लाहने अवतरली आहे, तर ते म्हणतात की आम्ही तर त्या गोष्टीचे अनुकरण करू ज्यावर आमचे पूर्वज आम्हाला आढळले आहेत. काय हे त्यांचेच अनुकरण करतील जरी शैतान त्यांना भडकत्या आगीकडेच बोलावीत राहिला असेल? ज्या माणसाने, आपल्या स्वत:ला अल्लाहच्या स्वाधीन केले आणि आचरणाने तो नेक असेल, त्याने वास्तविकत: एक विश्वसनीय आधार धरला, आणि सर्व मामल्यांचा अंतिम निर्णय अल्लाहच्याच हाती आहे. आता जो सत्याचा इन्कार करतो त्याच्या द्रोहाने तुम्हाला दु:खात लोटू नये त्यांना परतून यावयाचे तर आमच्याकडेच आहे, मग आम्ही त्यांना दाखवून देऊ की ते काय काय करून आलेले आहेत. निश्चितच अल्लाह उरांत लपलेली गुपितेसुद्धा जाणतो."

*(दिव्य कुरआन, ३१:२१-२३)*

**तीसरा मार्ग-** तीसरा मार्ग पवित्र कुरआनने हा सांगितला आहे की मनुष्य जेव्हा अल्लाहच्या आज्ञा, आदेश सोडून दुसऱ्या लोकांच्या आज्ञा व आदेश पाळू लागतो आणि असा विचार करतो की, अमुक मोठा मनुष्य आहे अथवा अमुक माणसाच्या हातात माझी रोजी (अन्न) आहे म्हणून त्याचे म्हणणे ऐकले पाहिजे. अमुक मनुष्य मोठा पदाधिकारी आहे. म्हणून त्याची आज्ञा पाळली पाहिजे. अमुक महाबळी आपल्या शापाने मला नेस्तनाबूत करतील किंवा आपल्याबरोबर स्वर्गात घेऊन जातील म्हणून ते जे सांगतील तेच खरे आहे. अमुक जात फार प्रगती करीत आहे तिच्या पद्धती अवलंबिल्या पाहिजेत. तर असल्या माणसासाठी सद्बुद्धी प्राप्त होण्याचा मार्ग बंद पडतो पवित्र कुरआनमध्ये उल्लेख आहे,

"आणि हे पैगंबर (स.), जर तुम्ही त्या लोकांतील बहुतेकांच्या सांगण्यानुसार वागू लागला जे भूतलावर वास्तव्य करून आहेत, तर ते तुम्हाला अल्लाहच्या मार्गापासून भ्रष्ट करतील, ते तर फक्त कल्पनेच्या आधारे चालतात व तर्क लढवितात."

*(दिव्य कुरआन, ६:११६)*

म्हणजेच मनुष्य सन्मार्गावर तेव्हाच असू शकतो जेव्हा त्यांचा अल्लाह वा परमात्मा एकच असेल. ज्याने शेकडो-हजारो ईश्वर स्वीकारले असतील आणि जो कधी या ईश्वराच्या म्हणण्यानुसार तर कधी त्या ईश्वराच्या म्हणण्यानुसार चालत असेल तर त्याला सन्मार्ग कसा मिळू शकेल?

आता आपणास कळले असेल की, मार्गभ्रष्टतेचे प्रमुख तीन मार्ग (कारणे) आहेत :-

१) मनाची गुलामी.

२) वडिलोपार्जित (वाडवडील), घराणे आणि खानदानी व समाजाचे रिती-रिवाज, रूढीपरंपरा यांची गुलामी.

३) जगातील सामान्यपणे त्या लोकांची गुलामी ज्यात श्रीमंत लोक, तत्कालीन शासक, भोंदू धर्मगुरू व पथभ्रष्ट जाती, समाज यांचा समावेश होतो.

ह्या तीन मोठ्या मूर्ती आहेत ज्या ईश्वराच्या दावेदार बनल्या आहेत. जो मनुष्य मुस्लिम बनू इच्छितो त्याला सर्वप्रथम या तिन्ही मूर्तींचे भंजन केले पाहिजे. त्यानंतरच खऱ्या अर्थाने तो मुस्लिम बनू शकेल. ज्याने या तिन्ही मूर्ती आपल्या हृदयात वसविल्या असतील तर तो अल्लाहचा दास, भक्त बनणे कठीण आहे. तो दिवसातून पन्नास वेळा नमाज अदा करून व लोकांना दाखविण्याकरिता उपवास ठेऊन आणि मुस्लिमाप्रमाणे चेहरा बनवून लोकांना फसवून धोका देऊ शकतो. स्वतःचा आपल्या मनालसुद्धा फसवू शकतो की मी पक्का मुस्लिम आहे, परंतु तो अल्लाहला धोका देऊन फसवू शकत नाही.

बंधुनो! आज मी आपल्यासमोर ज्या तीन मूर्तींचा उल्लेख केला त्यांची पूजा-अर्चा, उपासना म्हणजेच खरोखर अनेकेश्वरत्व (शिर्क) आहे. आपण दगडाच्या मूर्ती तोडल्या फोडल्या, वीट व चुन्यांनी बनविलेले मंदीर पाडले; परंतु हृदयांमध्ये जी मंदिरे बनलेली, वसविलेली आहेत त्यांच्याकडे विशेष लक्ष दिले नाही. म्हणून मुस्लिम बनण्यासाठी सर्वांत अधिक आवश्यकच नव्हे तर सर्वप्रथम अट म्हणजे या मनातील मूर्ती भंग करण्याची, तोडण्याची आहे. मला खात्री आहे की, संपूर्ण जगामध्ये व संपूर्ण हिंदुस्थानात जितके नुकसान व हानी मुस्लिमांची होत आहे ती याच तिन्ही मूर्तींच्या (त्रिमूर्ती) पूजेचा, उपासनेचा परिणाम आहे. विनाश आणि अपमान, लाचारी आणि संकटाचे मूळ या तीनही गोष्टींत आहे. जगामध्ये मुस्लिमांची संख्या अगणित आहे. परंतु त्यांना काहीच मानमर्यादा, इज्जत आणि अधिकार प्राप्त नाहीत. या भारतातसुद्धा मुस्लिमांची संख्या पुष्कळ आहे. परंतु येथेही आपले वजन, अधिकार काहीच नाही. उलट काही अत्यल्प जातीचे वजन मुस्लिमापेक्षा अधिक आहे. या कारणाचा कधी आपण विचार केला आहे काय? याचे कारण फक्त हेच आहे की, स्वेच्छांची, मनाची गुलामी,

घराण्यांच्या खानदानी परंपरेची गुलामी आणि अल्लाहशिवाय दुसऱ्या लोकांची, मानवांची गुलामी. ह्या गुलामीने आपली शक्ती, ताकद आतून पोखरून टाकली आहे.

आपल्यामध्ये रजपूत आहेत, मुगल आहेत, जाट, क्षत्रिय आहेत, अफगाण आहेत. असो, अनेक समूह व समाज आहेत. इस्लामने या सर्व जातींना समाज घटकांना एकत्र आणून एक जात, एक समाज आणि एकदुसऱ्याचे भाऊभाऊ (बंधु) अशी एक पक्की, कणखर भिंत बनविण्याकरिता सांगितले होते की, ज्याची वीट एक दुसऱ्याशी जुडलेली असेल. परंतु आपण अद्याप तेच जुनेपुराणे विचार घेऊन बसला आहात. ज्याप्रमाणे मुस्लिमेतरांमध्ये वेगवेगळे गोत्र आहेत, त्याचप्रमाणे आपल्यामध्येसुद्धा वेगवेगळे समूह व घटक आहेत. आपापसात मुस्लिमाप्रमाणे विवाह होत नाहीत, एकमेकांशी भाऊबंधकी व बंधुभाव नाही, तोंडाने आपण एकदुसऱ्याला मुस्लिम बंधू म्हणतो, परंतु वास्तविकत: आपल्यामध्ये तेच भेदभाव आहेत जे इस्लामपूर्वी होते. या भेदभावामुळे, तफावतींमुळे आपणाला एक कठीण, कणखर आणि मजबूत एक भिंत बनवू दिले नाही. आपली प्रत्येक वीट वेगवेगळी आहे. आपण एकत्रितपणे उठूही शकत नाही, आणि मिळून एकत्रितपणे एखाद्या संकटाला तोंडही देऊ शकत नाही. जर इस्लामच्या शिकवणीप्रमाणे आपणास सांगितले गेले की, तोडून टाका हा भेदभाव व तफावत आणि आपापसात एक व्हा, तर आपण काय म्हणाल? असेच ना की, आमचे वाडवडिलांच्या परंपरा, रुढी ज्या चालत आलेल्या आहेत त्या आम्ही सोडू शकत नाही, याचे अल्लाहकडून काय उत्तर येते? फक्त हेच ना की, तुम्ही रिवाज, परंपरा सोडू नका, अज्ञानी रीती-रिवाजांचे प्रथेचे अनुकरण करा तर आम्हीसुद्धा तुम्हाला तुकडे करुन विभाजित करु आणि तुमची विपुल संख्या असूनदेखील तुम्हाला लज्जित व अपमानित करुन दाखवू.

अल्लाहने आपल्याला आदेश दिला होता की, तुमच्या वारसाहक्कात सर्व मुले व मुली सामील आहेत. आपण याचे उत्तर काय देता? असे की आमच्या वाडवडिलांच्या कायद्यात मुलगे व मुली सामील नाहीत आणि हे की, आम्ही अल्लाहच्या कायद्याऐवजी वडिलोपार्जित कायदा मानतो. कृपा करुन मला सांगा की, काय इस्लाम याचेच नाव आहे? आपणास सांगितले जाते की हा घराण्याचा कायदा मोडा. आपल्यापैकी प्रत्येक जण म्हणतो की, जेव्हा सर्वजण मोडतील तेव्हा मीसुद्धा मोडीन. जर दुसऱ्यांनी मुलीला संपत्तीतील हिस्सा दिला नाही आणि

मी दिला तर माझ्या घराची संपत्ती दुसऱ्याजवळ जाईल. परंतु दुसऱ्याच्या घराची संपत्ती माझ्या घरी येणार नाही. विचार करा की, या उत्तराचा अर्थ काय आहे. काय अल्लाहच्या कायद्याची अंमलबजावणी या अटीवर केली जाईल की दुसऱ्याने केली तर आपणसुद्धा कराल? उद्या आपण म्हणाल की, दुसऱ्यांनी व्यभिचार केला तर मीसुद्धा करीन. दुसरे चोरी करतील तर मीसुद्धा करीन. म्हणजेच दुसरे लोक जोपर्यंत सर्व अपराध, गुन्हे सोडून देत नाहीत तोपर्यंत मीसुद्धा सर्व गुन्हे, अपराध करत राहीन. गोष्ट अशी आहे की याबाबतीत तिन्ही मूर्तींची पूजा होत आहे. मनांची, वाडवडिलांची आणि शिर्कची (अनेकेश्वरत्वाची) सुद्धा गुलामी केली जात आहे. आणि या तिन्ही प्रकारच्या गुलामीबरोबरच इस्लामचा पण दावा आपण करतो आहोत.

ही केवळ दोन उदाहरणे आहेत, नाहीतर डोळे उघडून बघितले तर अशा प्रकारचे अनेक लोक आमच्या लोकांमध्ये पसरलेले आढळतील आणि या सर्वामध्ये आपणास हेच आढळेल की कुठे एका मूर्तीची पूजा होत आहे आणि कुठे तिन्ही मूर्तींची उपासना होत आहे. जेव्हा ह्या (त्रिमूर्ती) मूर्तींची पूजा-अर्चा चालू असेल आणि त्याचबरोबर इस्लामचा दावा ही केला जात असेल तर आपण कशी आशा बाळगू शकता की, आपल्यावर अल्लाहकडून त्या कृपेचा वर्षाव होईल जिचे वचन एका खऱ्या-सच्चा मुस्लिमाला दिले गेले आहे?

- समाप्त -